स्थापना - ३०/४/१९६५

"स्वच्छतेतुन समृद्धीकडे"

ISO-9001-2015 प्रमाणित मानांकित



# ग्रामपंचायत कासार-आंबोली



ता. मुळशी, जि, पुणे

निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त-महात्मा गांधी विशेष तंटामुक्त पुरस्कार प्राप्त-ईको व्हिलेज पुरस्कार प्राप्त

ऑफिस दुरध्वनी क्र.: ०२०-६५२०३२३२

Email : grampanchaytkasaramboli@gmail.com Website : www.gpkasaramboli.in

| श्री.धनराज क्षीरसागर | सौ.पूजा चेतन सुतार | श्री.उमेश दत्तात्रय सुतार |
| --- | --- | --- |
| (ग्रामविकास अधिकारी) | (उपसरपंच) | (सरपंच) |

**सभासद**

- सौ.सुवर्णा राजेंद्र मारणे
- सौ.नेहा गणेश सुतार
- श्री.शंकर पोपट सुतार
- श्री.स्वप्निल दादासाहेब कांबळे
- सौ.छाया संजय भिलारे
- सौ.रेश्मा भरत गायकवाड
- श्री.सचिन कुंडलिक धुमाळ
- सौ.माधुरी सागर धुमाळ
- सौ.प्रिती सुनिल शिंदे
- श्री.समीर शंकर शिंदे
- श्री.ओंकार नंदू गायकवाड

जावक क्र. दिनांक

ग्रामपंचायत कासारआंबोली
जा.क्र 2451२
दि. ९/१/२४
ता. मुळशी, जि. पुणे

## नाहरकत दाखला

सरपंच / ग्रामसेवक कसाराआंबोली ता. मुळशी. जिल्हा पुणे यांज कडून दाखल देण्यात येतं की या वर्षी (2023-2४) कन्नड संघ पुणे संचलित कावेरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पुणे गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर दि.१६ ते२२ जानेवारी २०२४ या कालावधीत आयोजन करण्यास ग्रामपंचायत कसाराआंबोली काहीही हरकत नाही. तसेच या शिबीराकरिता आमच्याकडून मोलाचे सहकार्य मिळेल.

सबब दाखला लेखी मागणीवरून दिला असे.

P.C.Sutar
उपसरपच
ग्रामपंचायत कासारआंबोली
ता. मुळशी, जि. पुणे

स्थापना - ३०/४/१९६५

"स्वच्छतेतुन समृद्धीकडे"

ISO-9001-2015 प्रमाणित मानांकित



# ग्रामपंचायत कासार-आंबोली



ता. मुळशी, जि, पुणे

निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त-महात्मा गांधी विशेष तंटामुक्त पुरस्कार प्राप्त-ईको व्हिलेज पुरस्कार प्राप्त


ऑफिस दुरध्वनी क्र.: ०२०-६५२०३२३२

Email : grampanchaytkasaramboli@gmail.com Website : www.gpkasaramboli.in

श्री.धनराज क्षीरसागर (ग्रामविकास अधिकारी) | सौ.पूजा चेतन सुतार (उपसरपंच) | श्री.उमेश दत्तात्रय सुतार (सरपंच)



❊ सभासद ❊

सौ.सुवर्णा राजेंद्र मारणे
सौ.नेहा गणेश सुतार
श्री.शंकर पोपट सुतार
श्री.स्वप्निल दादासाहेब कांबळे
सौ.छाया संजय भिलारे
सौ.रेश्मा भरत गायकवाड
श्री.सचिन कुंडलिक धुमाळ
सौ.माधुरी सागर धुमाळ
सौ.प्रिती सुनिल शिंदे
श्री.समीर शंकर शिंदे
श्री.ओंकार नंदू गायकवाड


जावक क्र. : दिनांक :

ग्रामपंचायत कासारआंबोली
जा.क्र ८५८
दि. २०/१/२४
ता. मुळशी, जि. पुणे

## प्रमाणपत्र

कन्नड संघ संचालित कावेरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. १६ जानेवारी ते २२जानेवारी २०२४ दरम्यान कासार आंबोळी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथे आयोजित करण्यात आले. "युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास'अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती हे शिबिराचे ब्रीदवाक्य आहे. सदर श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन समारंभ दि. १७ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक अग्रवाल यांचे विशेष सहकार्य लाभले, तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रभारी प्राचार्या डॉ. मुक्ता करमरकर यांनी सर्वांचे स्वागत केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.निलेश नेमाडे यांनी प्रास्ताविकाद्वारे शिबिराची रूपरेषा मांडली. या प्रसंगी कासार आंबोली गावाचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य शंकर सुतार यांनी रा से यो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधताना डॉ. मुक्ता करमरकर यांनी शिस्तबद्ध वर्तवणुकीने समाज कार्यात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. तसेच कावेरी बक्सा ग्रंथालय उभारू असे सांगितले.डॉ.मुक्ता करमरकर यांनी गावासाठी खुले ग्रंथालय ही संकल्पना मांडत पुस्तके देणगी म्हणुन देण्याची घोषणा केली, आणि दरवर्षी कावेरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व्यवस्था केल्याबद्दल सर्व ग्रामवासियांचे आभार मानले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना गावाच्या वातावरणातून शिकण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच त्यांनी कासार आंबोली ग्रामपंचायत, तेथील सदस्य आणि ग्रामस्थांकडून वर्षानुवर्षे मिळत असलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना गावाच्या वातावरणातून शिकण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी प्रोत्साहित केले. रा. से.यो. सहाय्यक अधिकारी प्रा. सुजाता बच्छाव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

श्रमदान शिबीर दरम्यान स्वयंसेवकांनी कुष्ठरुग्ण शोध व क्षयरुग्ण शोध मोहीम सर्वेक्षण केले, शेतामध्ये वाफे व बांध बांधून श्रमदान केले, प्लास्टिक मुक्त गाव आणि तंबाखु मुक्त गाव विषयी जनजागृती केली. स्वयंसेवकांनी पर्यावरण जागृती केली, स्वछता अभियान, वृक्ष संवर्धन केले. शिबिर दरम्यान विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आले. डॉ आनंद बुद्धिकोट यांनी शिष्यवृत्ती योजना  याबद्दल मार्गदर्शन केले, प्रा.सुजाता बच्छाव आणि सई कुलकर्णी यांनी संघ बांधणीचे महत्व या बद्दल मार्गदर्शन केले. स्वाती मॅडम यांनी शब्द आणि अभिव्यकी खेळ याबद्दल युवांसाठी आर्थिक व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान दिले आणि आर्थिक गरजा, वेळेचे नियोजन आणि आर्थिक बचत या बद्दल मार्गदर्शन केले. डॉ. अश्विनी देशपांडे यांनी लोकसंख्या नियंत्रण यावर मार्गदर्शन केले. विंग कमांडर मिंजुर यग्नरामन यांनी व्यक्तिमत्व विकास व वायु सेनेतील नोकरीच्या उपलब्ध संधी विषयी मार्गदर्शन केले. गौरव भिडे आणि अक्षय भोसले यांनी महिला सक्षमीकरण यावर प्रकाशझोत टाकला.कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक निलेश नेमाडे यांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्याकरिता मार्गदर्शन केले. विध्यार्थ्यांसाठी बौद्धिक खेळ घेण्यात घेण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी दिंडीच्या माध्यमातून महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडविले. तसेच गावातील महिलांसाठी होम मिनिस्टर चा कार्यक्रम व हळदी कुंकू समारंभ आयोजित केला व त्यातील गावातील महिलांनी सक्रिय सहभाग घेतला.

शिबिराची सांगता २१ जानेवारी २०२४ या रोजी झाली. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख अध्यक्ष मालतीताई कलमाडी,कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक अग्रवाल,प्रभारी प्राचार्या डॉ. मुक्ता करमरकर यांनी विद्यार्थ्यांनी शिबिरांतर्गत राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले तसेच गावकऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.माननीय सरपंच आणि उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

कावेरी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय सन २०१४ पासून ते २०२४ पर्यंत सलग राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबीर मु.पो कासार आंबोली ता. मुळशी, जि. पुणे येथे आयोजित करत आहेत.

या वर्षांमध्ये ग्रामपंचायतीला निर्मल ग्राम पुरस्कार, विशेष तंटामुक्ती पुरस्कार तसेच स्वच्छता पुरस्कार यांसारखे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ह्या पुरस्कार प्राप्तीसाठी ग्रामपंचायतीने गावात विविध उपक्रम राबविले आहेत त्यामध्ये कावेरी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा खारीचा वाटा आहे, त्याबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने या निस्वार्थी सेवेसाठी स्वयंसेवकांचे आणि त्यांनी राबविलेल्या उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले.

PCSutar

उपसरपंच

ग्रामपंचायत कासारआंबोली

ता. मुळशी, जि. पुणे